दै. सत्यप्रभा

नांदेड, शुक्रवार,
दि. ९ जून २०२३ ।

# दरोड्याच्या गुन्ह्यातील टिप देणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**नांदेड, दि. ८ :** मुखेड पोलीस ठाणे हद्दीत दरोडयाच्या गुन्हयातील टिप देणा-या आरोपीच्या स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने मुसक्या आवळल्या.

मुखेड हद्दीत दि. एक जून रोजी चांडोळा येथून भगणूरकडे जात असताना फिर्यादीस दोन मोटार सायकलवर पाच जणांनी येवून कट मारुन मोटार सायकलखाली पाडली. चाकूचा धाक दाखवून नगदी दोन लाख २५ हजार रुपयाची बॅग व एक बायोमॅट्रीक टॅब असा एकूण दोन लाख ४५ हजार ५०० रुपयाचा मुद्देमाल जबरीने चोरुन नेला होता. त्यावरून मुखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी सदर गुन्हयाची उकल करुन एका आरोपीस अटक करण्यात आली होती.

सदर गुन्हयातील इतर आरोपींना अटक करण्यासाठी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांनी आदेशीत



केले होते. त्या अनुषंगाने स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांचे पथक आरोपींचा व मुद्देमालाचा शोध घेत असताना दि. ७ जून रोजी मुखेड पोलीस ठाणे हद्दीत असताना गुप्त बातमी मिळाली की, मुखेडमधील आरोपींना सदर माहिती देवून मदत करणारा आरोपी कपील गायकवाड (रा. चांडोळा) हा खंडगांव फाटा (ता. मुखेड) येथे थांबला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी जावून कपील गायकवाड यास ताब्यात घेवून विचारपुस केली असता आरोपीने व त्याच्या मित्रांनी फायनान्सचे पैसे लुटण्याचा प्लॅन केला होता. फिर्यादीचे लोकेशन त्याच्या आरोपी मित्रांना सतत देत होता. त्याने व त्याचे इतर पाच मित्रांनी मिळून सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. नमूद आरोपीस पुढील तपासकामी मुखेड पोलीस ठाण्यात येथे देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, खंडेराव धरणे, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक व्दारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, पोलीस नाईक बालाजी तेलंग, पोलीस कॉन्स्टेबल विलास कदम, गणेश धुमाळ, चालक पोलीस हेड कॉन्स्टेबल अर्जुन शिंदे, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेंद्र सिटीकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल दिपक ओढणे यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे पोलीस अधीक्षक कोकाटे यांनी कौतुक केले आहे.

दै. लोकमत दि. 09/06/2023

दै. लोकमत दि. 09/06/2023

# लूटण्याचा प्लॅन 'लोकेशन' देणाराही गेला 'लॉकअप'मध्ये

## मुखेडचे दरोडा प्रकरण : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** फायनान्सचे पैसे लुटण्याचा प्लॅन करून आरोपींना लोकेशन देणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७ जून रोजी ताब्यात घेतले आहे. त्यामुळे दरोडा प्रकरणात दुसरा आरोपी गजाआड झाला आहे.

मुखेड तालुक्यातील चांडाळा येथून भगणूरकडे जात असताना मोटारसायकलवर आलेल्या पाच जणांनी फिर्यादीच्या मोटारसायकलला कट मारून चाकूचा धाक दाखवत २ लाख २५ हजार रुपयांची बॅग आणि एक सॅमसंग मोबाइल चोरून नेला होता. याप्रकरणी मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा तपास करीत असताना एका आरोपीस यापूर्वीच अटक केली होती. त्यामुळे इतर आरोपी आणि प्रकरणातील मुद्देमालाचा शोध घेत असताना पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकाला आरोपींना मदत करणारा कपिल गंगाराम गायकवाड हा खंडगाव फाटा येथे थांबल्याची माहिती मिळाली. ७ जून रोजी कपिल गायकवाड यास पथकाने ताब्यात घेतले.

### आरोपीसह सहा मित्रांनी मिळून केला गुन्हा



आरोपी व त्याच्या मित्रांनी फायनान्सचे पैसे लुटण्याचा प्लॅन केला होता. त्यासाठी फिर्यादीचे लोकेशन कपिल गायकवाड हा आरोपी मित्रांना देत होता. त्याने व इतर पाच मित्रांनी मिळून हा गुन्हा केल्याचे त्याने कबूल केले. आरोपीस पुढील तपासकामी पोलिसांकडे सुपूर्द केले.